| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **आरोग्य सेवा संचालनालय**<br>(महाराष्ट्र राज्य)<br>"आरोग्य भवन" सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,<br>बीपी.डिमेलो रोड मुंबई - ४०० ००१ | |

| कार्यालय<br>संचालक (वैयक्तिक) | दूरध्वनी<br>(०२२)२२६२१०३१-३६<br>(०२२)२२६२१००६ | Website : http://maha-arogya.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email: miscell@rediffmail.com<br>Fax : (022) 22621034 / 22620234 (DHS) |
|---|---|---|
| | | क्र.संआसे /जन्म-मृत्यु / कक्ष-१८/12967-13032/१७<br>दिनांक :- 11/22/09/2017 |


प्रति,
१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू,
जिल्हा परिषद, ......... (सर्व)
२) आरोग्याधिकारी
तथा निबंधक, जन्म-मृत्यू,
महानगरपालिका, ........ (सर्व)
३) कार्यकारी आरोग्य अधिकारी
तथा निबंधक, जन्म-मृत्यू,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ साऊथ वार्डस, परळ, मुंबई.

विषय - मृत्यू नोंदणीसाठी आधारकार्ड आवश्यक असल्याबाबत.

संदर्भ - १) अवर सचिव, सार्वजनिक आरोगय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रं.जमृनों/२०१७/१३००/प्र.क्रं.४६९/कुक, दिनांक १८/०८/२०१७.
२) महानिबंधक जन्म-मृत्यू नोंदणी केंद्रिय गृह मंत्रालय यांची अधिसूचना क्रं.१/१२/२०१४/व्हीएस-सीआरएस, नवी-दिल्ली, दि.०४/०८/२०१७.

राज्यात जन्म-मृत्यु नोंदणी केंद्र शासनाच्या जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २००० अन्वये करण्यात येते.

राज्यात सन २०१६ पासून ग्रामिण व शहरी भागात केंद्र शासनाची संगणक प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे. त्याच सोबत संगणक प्रणाली मध्ये जन्म-मृत्युची घटनाही आधार क्रमांकाशी जोडण्यात येणार असल्याबाबत यापूर्वीच सर्व जिल्हा निबंधकांना या कार्यालयाच्या दिनांक २५/११/२०१४ च्या तसेच दिनांक १३/०५/२०१५ च्या परिपत्रकामध्ये मार्गदर्शन करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे उपरोक्त विषयाबाबत मा.अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भ क्रं.१ व महानिबंधक, भारत सरकार, नवी-दिल्ली यांचे संदर्भ क्रं.२ च्या अधिसूचने मध्ये नमुद केल्याप्रमाणे दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून मृत्यू पावलेल्या व्यक्तीची मृत्यू नोंदणीसाठी खात्रीशीर ओळख प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने आधार क्रमांक आवश्यक करण्यात आला आहे.

जर अर्जदाराकडे मृत व्यक्तीचा आधार नोंदणी क्रमांक (EID) उपलब्ध नसल्यास अर्जदाराच्या त्याच्या/तिच्या माहिती नुसार मृत व्यक्तीचा आधार क्रमांक उपलब्ध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. जर अर्जदाराने सादर केलेले प्रमाणपत्र खोटे आढळल्यास आधार अधिनियम २०१६ व जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील तरतुदीनुसार गुन्हा ठरु शकतो असे संबंधिताना सुचित करावे.

अर्जदाराने मृत व्यक्तीची माहिती देणारा तसेच पति/पत्नी व आई-वडील यांचाही आधार क्रमांकाची माहिती द्यावी. सदर योजना जम्मू-काश्मीर, आसाम व मेघालय या राज्यातील रहिवाशांना लागू असणार नाही.

सदर अधिसूचना दिनांक ०४/०८/२०१७ ची प्रत उचित कार्यवाहीस्तव सोबत जोडली आहे. तरी कृपया आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामिण व शहरी भागातील सर्व निबंधकांना अंमलबजावणी करणेबाबत त्वरित आदेश निर्गमित करावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तसेच उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ) तथा उपमुख्यनिबंधक, जन्म-मृत्यु, पुणे-१ यांना अवगत करावे.

संचालक आरोग्य सेवा
तथा मुख्य निबंधक, जन्म-मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

प्रत - मा.आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुक्तालय, मुंबई.

प्रत - मा.अवर सचिव (कुक) सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय, संकुल इमारत, १० वा मजला, मुंबई-४०० ००१.
(आपले पत्र क्रं.जमृनों/२०१७/१३००/प्र.क्रं.४६९/कुक, दिनांक १८/०८/२०१७

प्रत - The Registrar General of India, Government of India, Ministry of Home Affairs, V.S.Division, West Block-I, R.K.Puram, New Delhi-110066.

प्रत - उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.